पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १२४

सभावृत्तांत

दिनांक - २२/०७/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २२/०७/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. वाघेरे सुनिता राजेश
३. मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
४. मा. कदम सदगुरु महादेव
५. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा. शेंडगे आशा सुखदेव
७. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
८. मा. भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापू
९. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
१०. मा. तरस बाळासाहेब जयवंत
११. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पाटील – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखपाल, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.सवणे, मा.काची, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.केदारी, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक), मा.पोमण - संगणक अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.५५ - समुह संघटकांचे मुदतवाढीबाबत.

विषय क्र.५६ - मे.प्रियांका इन्टरप्राईजेस यांना मुदतवाढ देणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५७ - मा.स्थायी समिती ठरावामध्ये दुरुस्ती करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५८ - सालाबादप्रमाणे नागपंचमी साजरी करणेबाबत - मा.प्रसाद शेट्टी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५९ - अंदाजपत्रकामध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६० - ब क्षेत्रिय कार्यालयाचे सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षामध्ये तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६१ - सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील इ क्षेत्रिय कार्यालयाचे कामांच्या तरतूदमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६२ - संत ज्ञानेश्वर उद्यान से.नं.२८ मधील मंडपातील काही भाग विरंगुळा केंद्राकरीता विना मोबदला देणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६३ - भोसरी मधील आरक्षण क्रमांक ४१४ येथे उद्यान विकसित करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६४ - महापालिकेत येणा-या अभ्यागत, प्रमुख पाहुणे, मान्यवर यांना समुहशिल्प भेट देणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६५ - सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील ब मुख्यालयातील मा.स्थायी समितीच्या ठरावात दुरुस्ती व तरतुदीमध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६६ - सितांगण उद्यानाबाबत - मा.आशा शेंडगे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६७ - तरतुद वर्गीकरणाबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६८ - राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६९ - स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालयाचे कामाचे तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७० - मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत योजना क्र.७ मागासवर्गीय युवकांना विविध प्रशिक्षण देणेची योजना सुरु करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७१ - महिला बालकल्याण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या महिला बचत गटांना अनुदान वाटप करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७२ - सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षात तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७३ - स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालयाचे तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७४ - सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील फ प्रभाग मुख्यालयाचे कामांचे तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७५ - लिपिक पदावर तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नेमणूक करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७६ - सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षात तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७७ - कै.अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन व्यायामशाळा व कै.मधुकर पवळे व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत - - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७८ - सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षात तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७९ - च-होली येथील वडमुखवाडी नाला व ताजणेमळा नाला येथे जलनि:सारण नलिका टाकणेसाठी अस्तित्वातील मुंबई-पुणे पेट्रोल लाईन क्रॉसिंग करणेकामी परवानगी मिळणेबाबतची फी अदा करणेबाबत.

विषय क्र.८० - पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांचे सांडपाण्यामुळे मुळा-मुठा व भिमा नदीचे पाणी दुषित झाल्यामुळे बाधित गावांमध्ये आर.ओ.यंत्रणा बसविणेबाबत.

विषय क्र.८१ - सन २०१४-१५ चे आर्थिक वर्षात तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८२ - सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापर्यंत उत्पन्नाची अट न घालता प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना शिवणयंत्राचे वाटप करणेबाबत - मा.आशा शेंडगे, मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८३ - मा.स्थायी समिती ठरावात दुरुस्ती करणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८४ - मा.स्थायी समिती ठराव रद्द करुन सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात स्थापत्य विभागा अंतर्गत कामांवर तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.विनय गायकवाड, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८५ - नविन वाहन खरेदीबाबत - मा.सदगुरु कदम, मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.आशा शेंडगे | अनुमोदक : मा.सुनिता वाघेरे

माजी महापौर अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे तसेच निगडी येथील सामाजिक कार्येकर्ते किरण काळभोर यांचे दु:खद निधन झालेले असलेने त्यांस श्रध्दांजली वाहून मा.स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २४/०७/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

मा.सभापती - गुरुवार दिनांक २४/०७/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १२४

सभावृत्तांत

( दिनांक २२/०७/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - २४/०७/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक २२/०७/२०१४ ची तहकूब सभा गुरुवार, दिनांक २४/०७/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. वाघेरे सुनिता राजेश
३. मा. बारणे माया संतोष
४. मा. लोंढे गणेश नारायण
५. मा. कदम सदगुरु महादेव
६. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
७. मा. शेंडगे आशा सुखदेव
८. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
९. मा. भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापू
१०. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
११. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
१२. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा. ढेरे, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखपाल, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख - अति.वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.काची, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता, मा.साळुंके – उद्यान अधिक्षक, मा.डॉ.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

अ) दिनांक २४/०६/२०१४ १/०७/२०१४ व ८/०७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - १२०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १/०७/२०१४ व ८/०७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - १२१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ८/०७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - १२२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ड) दिनांक १५/०७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक - १२३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७३५० विषय क्रमांक – १

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/३क/कावि/२३२/२०१४, दि.१५/०३/२०१४

विषय - प्रभाग क्र.३१ दिघी व इत्यादी ठिकाणी अनधिकृत बांधकामावर हायराईज मशिनरीने कारवाई करणेबाबत ...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५१ विषय क्रमांक – २

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वाहन दुरुस्ती कार्यशाळा

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/२/कावि/२४१/२०१४, दि.२८/०३/२०१४

विषय - सन २०१३-१४ करीता तरतूद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५२ विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/३क/कावि/२५९/२०१४, दि.२३/०४/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१५/२०१३-१४ मधील अ.क्र.३६ अन्वये, प्रभाग क्र.२९ इंद्रायणीनगर मधील से.क्र.१ मध्ये मोकळी जागा क्र.२ लगत नाल्यावर सी.डी.वर्क बांधणेकामी मे.पी.एन.नागणे (नि.र.रु.५६,०२,२४०/- (अक्षरी र.रु.छपन्न लाख दोन हजार दोनशे चाळीस) पेक्षा १४.९५% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.५०,०२,९४०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५३ विषय क्रमांक – ४
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/३३५/२०१४, दि.१३/०५/२०१४
विषय - निविदा नोटीस क्र.७/२०१३-१४ मधील बाब क्र. १३ अन्वये, राधानगरी व गंगोत्री पार्क उद्यान देखभाल करणेबाबत...

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५४ विषय क्रमांक – ५
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/३३२/२०१४, दि.१३/०५/२०१४
विषय - मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.७/२०१३-१४ मधील बाब क्र.१ अन्वये, संत तुकाराम उद्यान देखभाल कामाबाबत ...

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५५ विषय क्रमांक – ६
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/३३३/२०१४ दि. १३/०५/२०१४.
विषय - मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.७/२०१३-१४ मधील बाब क्र.६ अन्वये, वाहतुक नगरी उद्यान देखभाल कामाबाबत ....

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५६ विषय क्रमांक – ७
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/२५१/२०१४, दि.२०/०५/२०१४
विषय - मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२३ मधिल अ.क्र.०२ अन्वये, अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी लागणा-या उंच इमारती पाडणेसाठी यंत्र सामग्री पुरविणे.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५७ विषय क्रमांक – ८
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - नागरी सुविधा केंद्र
सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नासुके/१/कावि/१७०/२०१४, दि.२३/०५/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मुख्य कार्यालयात व चार क्षेत्रीय कार्यालय व्यतिरिक्त इतर १६ ठिकाणी नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित करुन कामकाज सुरु करणेकामी क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/२३४/२०१४ दि.७/३/२०१४ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. ही नविन १६ नागरी सुविधा केंद्र पुर्ण सक्षमपणे कार्यान्वित होईपर्यंत तसेच नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून मुख्य कार्यालय व क्षेत्रीय कार्यालय येथे आदेश क्र.संगणक/२/कावि/३८/२००९ दि.२८/२/२००९ मधील अटी व शर्तीनुसार मुख्य कार्यालय व चार क्षेत्रीय कार्यालय येथे दि.३० एप्रिल २०१४ पर्यंत अर्ज स्वीकृती करणेस व तद्नंतर दि.१ मे २०१४ ते दि.३१ मे २०१४ पर्यंत स्वीकृत केलेल्या अर्जांचे दाखले नागरिकांना वितरित करणेसाठी मे.सी.एस.इन्फोसीस, प्रा.लि., मुंबई यांना कामकाज करणेस मा.आयुक्तसो यांनी आदेश क्र.नासुकें/१/कावि/१४७/२०१४ दि.१२/५/२०१४ अन्वये मुदतवाढीस मान्यता दिलेली असल्याने यासाठी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५८ विषय क्रमांक – ९
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वायसीएमएच
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/भांडार/२/कावि/१४४/२०१४,दि.२६/०५/२०१४
विषय - यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या नेत्ररोग विभागातील Optikon A Scan मशीनसाठी आवश्यक Probe पुरवठा करणॆ....

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३५९ विषय क्रमांक – १०
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/२६४/२०१४, दि.०७/०६/२०१४
विषय - मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२३/२०१३-१४ मधील अ.क्र.१ अन्वये, ड प्रभागांतर्गत प्रभाग क्र.४४, ४५, ४६ व ५५ मधील अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेबाबत...

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६०
विषय क्रमांक – ११
दिनांक – २४/०७/२०१४
विभाग - स्थापत्य
सुचक – मा.सदगुरु कदम
अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२ब/कावि/२३७/२०१४, दि.१०/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३२/२०१३-१४ मधील अ.क्र.१६ अन्वये, थेरगांव प्रभाग क्र.५१ मध्ये विकास आराखड्यातील आरक्षणे विकसीत करणेकामी मे.श्रीगणेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.७०,०२,४२५/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख दोन हजार चारशे पंचवीस) पेक्षा ३१.५० % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ५०,३६,४९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६१
विषय क्रमांक – १२
दिनांक – २४/०७/२०१४
विभाग - उद्यान
सुचक – मा.आशा शेंडगे
अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१२८/२०१४, दि.१०/०६/२०१४

विषय - मनपाच्या उदयान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१३-१४ मधील बाब क्र.३ अन्वये, मनपाचे छत्रपती शाहू उद्यान चिंचवड येथील मिनी (रोड ट्रेन) भाडे तत्वावर देणेबाबत ...

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६२
विषय क्रमांक – १३
दिनांक – २४/०७/२०१४
विभाग - उद्यान
सुचक – मा.प्रसाद शेट्टी
अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१२६/२०१४, दि.१०/०६/२०१४

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.न.पा.च्या उदयान विभागाकडील नि.नो.क्र.६/२०१३-१४ मधील बाब क्र.३ अन्वये, नाना नानी पार्क (यमुनानगर) येथील मिनी रोड ट्रेन भाडे तत्वावर देणेकामी मे.यमुनानगर महिला अघाडी (नि.र.रू.४,४८,०००/- (अक्षरी र.रू.चार लाख आठ्ठेचाळीस हजार) या ठेकेदाराची प्रतिवर्ष भाडे र.रू.१८,०१०/- या दराने आलेली निविदा सर्वात जास्त दराची असल्याने मा अति.आयुक्त यांनी स्वीकृत करणेस मान्यता दिलेली असून सदरच्या ठेकेदारास भाडे तत्वावर ३ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६३ विषय क्रमांक – १४
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भः- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१२७/२०१४, दि.१०/०६/२०१४
विषय - नि.नो.क्र.६/२०१३-१४ मधील बाब क्र.२ अन्वये, सावरकर उद्यान (प्रेमलोक पार्क) चिंचवड उद्यान येथील मिनी टॉय (ट्रॅक ट्रेन) भाडे तत्वावर देणेबाबत .....

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६४ विषय क्रमांक – १५
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य पर्यावरण
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/७९२/२०१४, दि.१२/०६/२०१४
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील पवना नदीच्या पुररेषा आखणीबाबत..

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६५ विषय क्रमांक – १६
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/८४६/२०१४, दि.१६/०६/२०१४
विषय - जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाटीची जादा वजनाची बीले खाजगी आस्थापनाकडून वसुल करणेबाबत.

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६६ विषय क्रमांक – १७
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भः- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.डक्षे/३/कावि/२०६/२०१४, दि.१६/०६/२०१४
विषय - ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात औष्णीक धुरीकरण करणेकरीता पीकअप व्हॅन/टेम्पो भाडयाने घेणेबाबत...

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६७ विषय क्रमांक – १८

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/०४/कावि/१६०/२०१४, दि.२५/०६/२०१४

विषय - "मोफत शिवणयंत्र वाटप" या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६८ विषय क्रमांक – १९

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/२७४/२०१४, दि.२७/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२२/२०१३-१४ मधील अ.क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.५७ पिंपळेगुरव एच.डी.एफ.सी. बँक ते कृष्णा चौकापर्यंत डी.पी. रस्त्याच्या कडेने व कवडेनगर, विनायकनगर भागात पावसाळी पाण्यासाठी पाईप टाकणेकामी मे.सोहम एंटरप्रायजेस (नि.र.रु.३५,०१,४०१/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख एक हजार चारशे एक) पेक्षा ४०.९९ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. २१,६९,४८६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३६९ विषय क्रमांक – २०

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/२१६/२०१४, दि.०२/०७/२०१४

विषय - मैलाशुध्दीकरण प्रकल्प केमिकल्स खरेदी अंतर्गत पॉली ईलेक्ट्रोलाईट पुरवणेबाबत....

विषय क्रमांक २० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७० विषय क्रमांक – २१

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - ई-गव्हर्नन्स

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.प्रशांत शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्ह/८/कावि/२०१/२०१४, दि.०१/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी-चिंचवड मनपाचे www.pcmcindia.gov.in संकेतस्थळ (वेबसाईट) VDS Server वर Host करणे व त्याचे Security करणे कामासाठी मे.बालासाई नेट प्रा.लि. यांना Virtual Dedicated Server, RAM 1 GB, Disk Space SAN 50 GB, Bandwidth 100 GB/month,IP 1. India based या कामकाजाकरीता र.रु. ३६,०००/- + External Managed NAS Backup ( वेबसाईटचा पुर्णपणे Backup करिता ) र.रु.९,०००/- +

आणि WH-SCAN-SENT या Package चे रजिस्ट्रेशनकरिता र.रु.९,०००/- असे एकूण र.रु. ५४,०००/- + Service Tax १२.३६% र.रु. ६,६७४/- असे एकूण र.रु.६०,६७४/- अधिक Excess Bandwidth Charges प्रतिमहा १००GB पर्यंत Tariff Plan मध्ये उपलब्ध असुन त्या व्यतिरिक्त होणा-या जादा प्रत्येक २५GB साठी र.रु.३०००/- अधिक कर याप्रमाणे पुढील ६ महिने कालावधीसाठी प्रत्यक्ष होणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७१ विषय क्रमांक – २२
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - मध्यवर्ती भांडार विभाग
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/३९३/२०१४, दि.०३/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे १० कलमी कार्यक्रमांतर्गत सारथी पुस्तिका हिंदी मध्ये छपाईकामी मे.सृजन कम्युनिकेशन, नांदेड यांचेकडुन त्यांनी दिलेल्या दि.०५/०६/२०१४ चे दरपत्रकानुसार प्रती नग र.रु.७००/- प्रमाणे ५०० प्रतींसाठी र.रु. ३,५०,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख पन्नास हजार) मध्ये छपाई करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७२ विषय क्रमांक – २३
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/२२२/२०१४, दि.०४/०७/२०१४

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV/८/२०१३-१४ मधील अ.क्र.१ अन्वये, **पिंपरी चिंचवड मनपामधील मैलाशुध्दीकरण केंद्रामध्ये स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.** एच.एम.कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२३,३४,०३९/- [अक्षरी र.रू.तेवीस लाख चौतीस हजार एकोणचाळीस] पेक्षा - १ % कमी) दराने या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७३ विषय क्रमांक – २४
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - पाणीपुरवठा
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/६/कावि/८८४/२०१४, दि.०४/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२०/२०-२०१३/१४ मधील अ.क्र.३ अन्वये, जलक्षेत्र क्र.बी/१ अंतर्गत साईनगर, मामुर्डी येथील उंच पाण्याच्या टाकीचे आवारात सिमाभिंत बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.दीप कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.२६,१६,०९३/- [अक्षरी र.रू.सव्वीस लाख सोळा हजार त्र्यान्नव] पेक्षा २३.०५ **%** कमी) (भाववाढ फरक कलमासह) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७४ विषय क्रमांक – २५

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/२८०/२०१४, दि.०५/०७/२०१४

विषय - प्रभाग क्र.८९ कस्पटेवस्ती येथील स्मशानभूमी विकसीत करणेबाबत...

विषय क्रमांक २५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७५ विषय क्रमांक – २६

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - म.सा.भां.वैद्यकीय

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४००/२०१४, दि.०५/०७/२०१४

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तालेरा रुग्णालयाचे विस्तारीकरण करणेकामी आवश्यक साहित्य/उपकरणे खरेदीकरणेबाबत...

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७६ विषय क्रमांक – २७

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - क क्षेत्रिय कार्यालय

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/५१९/२०१४, दि.०५/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वायसीएमएच येथे LG AVAYA उत्पादक कंपनीचे Aria 1000 हि EPABX यंत्रणा बसविणेत आली आहे. सदर यंत्रणा सन २००५ मध्ये कार्यान्वित केलेली असुन सदर यंत्रणेचे नियमितपणे देखभाल दुरूस्तीचे कामकाज अधिकृत एजन्सी मे. डेटाकॉम नेटवर्किंग सोल्युशन्स, पुणे. यांचेकडून करून घेण्यात येत आहे. सदर एजन्सी ही उत्पादक कंपनीचे अधिकृत सेवा देणारी एकमेव एजन्सी आहे. तसेच त्यांनी आजपर्यंत समाधानकारक सेवा दिलेली आहे. पुढील कालावधी करीता कामाचे आदेश तातडीने देणे आवश्यक आहे, तरी मा. स्थायी समीती सभेच्या मान्यतेने मे. डेटाकॉम नेटवर्किंग सोल्युशन्स, पुणे ह्या अधिकृत एजन्सी कडून करारनामा करून थेट पद्धतीने करून घेण्यात यावे असे मत आहे.

प्रस्तूत कामाकरीता मागील तीन वर्ष कालावधिसाठी र.रू.५,५५,२९६/- इतका खर्च झालेला आहे. सदर कामाचा कालावधी दि.३१.०५.२०१४ रोजी संपत असुन त्या पुढील तीन वर्ष कालावधीसाठी एकुण र.रू.७,३०,३४०/- (सेवा करासह) इतक्या खर्चाचे दरपत्रक मे.डेटाकॉम नेटवर्किंग सोल्युशन्स, पुणे. ह्या अधिकृत एजन्सीने सादर केले आहे. आणि ते योग्य व वाजवी आहेत.

सदरचे काम हे विशिष्ट प्रकारचे असल्याने ते उत्पादक कंपनीचे अधिकृत एजन्सीकडूनच करून घेणे योग्य आहे. कारण सदरची यंत्रणा ही ईलेक्ट्रॉनिक्स प्रकारातील असुन त्यामध्ये जे प्रोग्राम्स व पार्ट्स वापरलेले असतात ते इतर कंपनीकडे उपलब्ध नसतात, त्यामुळे निविदा मागवुन अशा कामाकरीता निविदा प्राप्त होत नाहीत व त्यामध्ये वेळही वाया जातो. तरी कृपया सदरचे काम थेट पद्धतीने करारनामा करून अधिकृत एजन्सी मे.डेटाकॉम नेटवर्किंग सोल्युशन्स, पुणे. यांचेकडून करून घेणेस व तीन वर्ष कालावधिकरीता र.रू.७,३०,३४०/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७७ विषय क्रमांक – २८

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४७५/२०१४, दि.०४/०७/२०१४

विषय - चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र/अंब्रेला पार्क उद्यान देखभाल करणेबाबत...

विषय क्रमांक २८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७८ विषय क्रमांक – २९

दिनांक – २४/०७/२०१ विभाग - उद्यान

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४७४/२०१४, दि.०४/०७/२०१४

विषय - दक्षिण मुखी हनुमान मंदिर उद्यान देखभाल करणेबाबत...

विषय क्रमांक २९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३७९ विषय क्रमांक – ३०

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/६/कावि/४७३/२०१४, दि.०४/०७/२०१४

विषय - मनपाचे आ.क्र.६३ जुना पी.एम.पी.एम.एल. डेपो संततुकारामनगर उद्यान देखभाल करणेबाबत.

विषय क्रमांक ३० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८० विषय क्रमांक – ३१

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वैद्यकीय

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/कावि/३६९/२०१४, दि.०८/०७/२०१४

विषय - मनपाचे वैद्यकिय विभागांतर्गत राष्ट्रिय कार्यक्रमासाठी वाहने पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ३१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८१ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान

सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१६५/२०१४, दि.०८/०७/२०१४

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.६/२०१३-१४ अन्वये, स्पाईन रोड आण्णा भाऊ साठे उद्यान ते बिजलीनगर पुलापर्यंत मध्य दुभाजक नुतनीकरणासाठी शोभिवंत रोपे खरेदी करणेकामी मे.सुरज अँडव्हटायझिंग (को.र.रु.१,९१,३०५/- (अक्षरी र.रु.एक लाख एक्यान्नव हजार तीनशे

पाच) पेक्षा -४ टक्के कमी) दराचे कोटेशन स्विकृत करणेत आले असून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने, सदर काम पुर्ण झाल्याने मे.सुरज अँडव्हटायझिंग यांना केलेल्या कामाचे बील अदा करावयाचे असल्याने प्रस्तुत कामाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८२ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१६७/२०१४, दि.०८/०७/२०१४

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१४/२०१३-१४ अन्वये, सदगुरूदत्त उद्यान यमुनानगर व गजानन म्हेत्रे उद्यान कृष्णानगर याठिकाणी स्टोन गार्डन बेंच बसविणेकामी मे.सदिच्छा कन्सस्ट्रक्सन (को.र.रु.१,८६,२५०/- (अक्षरी र.रु.एक लाख शहाऐंशी हजार दोनशे पन्नास) पेक्षा - ६.१० टक्के कमी) दराचे कोटेशन स्विकृत करणेत आले असून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने, सदर काम पुर्ण झाल्याने मे.सदिच्छा कन्सस्ट्रक्सन यांना केलेल्या कामाचे बील अदा करावयाचे असल्याने प्रस्तुत कामाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८३ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - उद्यान
सुचक – मा.सुनिता वाघे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१६८/२०१४, दि.०८/०७/२०१४

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उद्यान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.१५/२०१३-१४ अन्वये, मनपाचे उद्यान विभागासाठी साहित्य खरेदी करणेकामी मे.एन.एल.वनवे कन्सस्ट्रक्शन (को.र.रु.१,९९,७७०/- (अक्षरी र.रु.एक लाख नव्यान्नव हजार सातशे सत्तर) पेक्षा -१५ टक्के कमी) दराचे कोटेशन स्विकृत करणेत आले असून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने, सदर काम पुर्ण झाल्याने मे. एन. एल. वनवे कन्सस्ट्रक्शन यांना केलेल्या कामाचे बील अदा करावयाचे असल्याने प्रस्तुत कामाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८४ विषय क्रमांक – ३५
दिनांक – २४/०७/२०१ विभाग - उद्यान
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.उद्यान/१३/कावि/१६९/२०१४, दि.०८/०७/२०१४

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.८/२०१२-१३ अन्वये, मनपाचे उद्यान विभागास हार,फुले गुच्छ इ.साहित्य पुरविणेकामी मे.श्री.गणेश पुष्प भांडार यांना पुर्वीच्याच दरानुसार हार, फुले, गुच्छ इत्यादी साहित्य पुरविणे या कामासाठी चार महिने कालावधीसाठी येणा-या र.रू.३,५०,०००/- (अक्षरी र.रू.तीन लाख पन्नास हजार) प्रत्यक्ष येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेची अति.आयुक्त यांची

मागणी असली तरी श्री गणेश पुष्प भांडार चिंचवड स्टेशन यांचे टेंडरची मुदत २९ जानेवारी पर्यंत होती परंतु १ फेब्रुवारी २०१४ ते ३१/०७/२०१४ पर्यंत ६ महिन्याचे अंदाजे बिलाची रक्कम रुपये ४,००,०००/- (चार लाख फक्त) होतात. तरी वरील ६ महिन्याची मुदतवाढ व ४,००,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८५ विषय क्रमांक – ३६
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/६०६/२०१४, दि.११/०७/२०१४
विषय - मनपाचे विविध विभागांसाठी विविध प्रकारच्या युपीएस बॅट-या खरेदीबाबत ...

विषय क्रमांक ३६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८६ विषय क्रमांक – ३७
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्ह/९/कावि/४०९/२०१४, दि.११/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.आयुक्त यांना व्हीडीओ कॉन्फरन्स सेवे व्दारे राज्यशासनाचे मंत्रालयीन विविध विभाग यांचे बरोबर संपर्क साधनेकरीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयात जावे लागते सदरबाबत यापूर्वी महानगरपालिकेमध्ये Tulip संस्थेची 2Mbps I:i (Point to point) लिज लाईन उपलब्ध करणेत आली होती. सदरची सेवा महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार बंद करणेत आलेली आहे. पर्यायी व्यवस्था NIC यांचे मार्फत उपलब्ध करणे शक्य आहे किंवा कसे या बाबत प्रयत्न करणेत आलेले आहेत. परंतू NIC मार्फत सदरची सेवा उपलब्ध होऊ शकलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासकीय मुख्य कार्यालय पिंपरी ते जिल्हाधिकारी कार्यालय पुणे या ठिकाणी 2Mbps I:i (Point to point) लीज लाईन उपलब्ध करणेकामी भारत संचार निगम लिमिटेड यांना र.रु.८५,२९०/- अदा करणेत आले आहेत. इंटरनेट लीज करीता आवश्यक असलेले मोडेम भारत संचार निगम लिमिटेड यांचेकडे उपलब्ध नसलेने त्याची स्वतंत्र खरेदी करावी लागणार आहे. यास मा.आयुक्त यांनी दि.०२.०५.२०१४ चे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यासाठी कोटेशन प्रसीध्द करणेत आली होती त्यामधे मे.मोनार्च टेक्नॉलॉजी (पुणे) प्रा.ली यांचे दर लघुत्तम प्राप्त झाले आहोत. त्यासाठी त्यांना र.रु.५२,६००/- (अक्षरी र.रू.बावन्न हजार सहाशे) चे पुरवठा आदेश निर्गत करणेत आले आहेत. सदरच्या होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८७ विषय क्रमांक – ३८
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/४/कावि/४२२/२०१४, दि.११/०७/२०१४
विषय - मनपाचे वैद्यकीय विभागास आवश्यक छपाई साहित्य खरेदीबाबत ....

विषय क्रमांक ३८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८८ विषय क्रमांक – ३९

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/६/कावि/१९४/२०१४, दि.०९/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०१३ करीता थेट पध्दतीने एकूण ५६ नग स्मृतीचिन्हे मे.महांकाळ आणि कंपनी, पिंपरी यांचेकडून करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करण्यात येणार असल्याने त्यापोटी येणा-या र.रू.६३,६५०/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ट हजार सहाशे पन्नास) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३८९ विषय क्रमांक – ४०

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१६७८/२०१४, दि.११/०७/२०१४

विषय - नि.नो.क्र.४-२०१३-१४ मधील अ.क्र.१२ अन्वये, प्रभाग क्र.८ विद्यानगर झोपडपट्टीमधील गोल्डन चौक येथे २६ सिट्सचे शौचालय बांधणेबाबत...

विषय क्रमांक ४० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९० विषय क्रमांक – ४१

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - कामगार कल्याण

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काक/१/कावि/३४८/२०१४, दि.११/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१४-२०१५ चे अंदाजपत्रकातील कामगार कल्याण विभागाचे अपंगकल्याणकारी योजना या लेखाशिर्षावरील र.रु.१०,००,०००/- तरतुदीतुन अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रू.तीन लाख) तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९१ विषय क्रमांक – ४२

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वैद्यकीय

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१/कावि/८२४/२०१४, दि.१४/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कत्तलखाना व्यावसायिकांकरिता खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये जनावरांचे कत्तलीकरिता परवानगी मिळणेकामी बोर्डामार्फत त्यांचे कत्तलखान्यामध्ये ई.टी.पी. (Effluent Treatment Plant) बांधून देणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्याकरिता अंदाजे र.रु. ७० लाख इतका खर्च अपेक्षित असल्याने खडकी कॅन्टॉनमेंट बोर्डाचे कत्तलखान्यामध्ये नविन ई.टी.पी. बांधणेकरिता, त्याकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चास, त्याकामी खडकी

कॅन्टॉनमेंट बोर्डासमवेत करारनामा करणेस तसेच नविन ई.टी.पी. कार्यान्वित होईपर्यंत महानगरपालिकेचा ई.टी.पी. खडकी बोर्डाकडे स्थानांतरण करणेसाठी व त्याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच परवानगी देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९२ विषय क्रमांक – ४३

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वायसीएमएच

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/पीजी/१/कावि/४५३/२०१४,दि.०८/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता आवश्यक असलेली प्रस्तावात नमुद प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली विविध पदे ही एकत्रित मानधनावर ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर भरणेस, तसेच सदर पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन Walk In Interview ने भरणेस आणि सदर पदांना प्रस्तावात नमूद प्रपत्र ब मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस आणि प्रपत्र अ मधील १ ते 2८ करीता उमेदवार न मिळालेस सदर पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९३ विषय क्रमांक – ४४

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - वायसीएमएच

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- **मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/भांडार/२/कावि/१८७/२०१४, दि.१४/०७/२०१४**

विषय - वायसीएम रुग्णालयाच्या PM Center मधील Cold Storage मशीन दुरुस्त करणेबाबत..

विषय क्रमांक ४४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९४ विषय क्रमांक – ४५

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य बीआरटीएस

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/३४०/२०१४, दि.१५/०७/२०१४

विषय - जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत प्रगतीपथावर असलेल्या औंध रावेत रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्याचे ४५ मीटर रुंदीने विकसित करणे.

विषय क्रमांक ४५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९५ विषय क्रमांक – ४६

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - नागरवस्ती

सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.सहा. आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/५/कावि/२९०/२०१४, दि.१४/०७/२०१४

मा.सहा. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

नागरवस्ती विकास योजना विभागा अंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. महापालिकेच्या र्निःसमर्थ (अपंग) कल्याणकारी योजना क्र.१ अन्वये मनपा हद्दीतील अंध, अपंग, कर्णबधीर विद्यार्थीना अपंग शिष्यवृत्ती देणे करीता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी जाहीर प्रकटनानुसार अर्ज मागविणेत आले होते. त्यानुसार २५० अर्ज प्राप्त झाले असुन अर्ज छानणी मध्ये १३५ अर्ज पात्र व ११५ अर्ज अपात्र झाले आहेत. तरी १३५ पात्र अर्जदारांना मंजूर दराने अर्थसहाय्य देण्याकरीता एकुण लाभार्थीपोटी र.रू.५,७८,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद प्रपत्र अ यादीनुसार १३५ पात्र लाभार्थीयाना र.रू.५,७८,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख अठ्ठ्याहत्तर हजार) चे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सेरेब्रल ऍक्टेशियाचे रुग्णासही शिष्यवृत्ती देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९६ विषय क्रमांक – ४७

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - म.सा.भां.वैद्य

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/४१६/२०१४, दि.१४/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयातील एक्स-रे विभागातील एक्स-रे फिल्म व एक्स-रे केमीकल खरेदीकामी ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे प्राप्त झालेल्या लघुत्तम दरानुसार मे.श्री कन्स्ट्रक्शन यांचे ७ आयटेम करीता र.रु. ४३,५७,७२३/- व मे.आकाश मेडीकअर यांचे ५ आयटेमकरीता र.रु.३,९६,१९५/- यांचेसमवेत करारनामा करुन व अनामत रक्कम घेवून खरेदी करणेकरीता येणा-या एकूण र.रु.४७,५३,९१८/- चे खर्चास तसेच निविदेतील प्राप्त झालेले लघुत्तम दर दोन वर्षाकरीता असलेने त्या कालावधीत रुग्णालयाकडून एक्स-रे फिल्म व एक्स-रे केमीकलची मागणी आलेस प्राप्त लघुत्तम निविदा दरानुसार खरेदी करण्यास व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९७ विषय क्रमांक – ४८

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/६३७/२०१४, दि.१५/०७/२०१४

विषय - मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक डांबरीकरण, देखभाल व दुरूस्ती करणे.

विषय क्रमांक ४८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९८ विषय क्रमांक – ४९
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.आशा शेंडग

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/१२१/२०१४, दि.१५/०७/२०१४

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०७/२०१३-१४ मधील ११ अन्वये, प्र.क्र.२६ मध्ये मोहननगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स डांबरीकरण करणेकामी मे.क्लिन्सी कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. २१,००,८५०/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख आठशे पन्नास) पेक्षा १८.९६९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१७,८७,४५७/- पर्यंतकाम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेवून कामाचा आदेश दिला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९९ विषय क्रमांक – ५०
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/७/कावि/५८०/२०१४, दि.१५/०७/२०१४

विषय - मनपाचे विद्युत विभागासाठी विविध लॅम्प खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ५० चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०० विषय क्रमांक – ५१
दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/७/कावि/५८१/२०१४, दि.१५/०७/२०१४

विषय - मनपाचे विद्युत विभागासाठी विविध बलास्ट साहित्य खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ५१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०१ विषय क्रमांक – ५२
दिनांक – २४/०७/२०१ विभाग - माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/५/कावि/११६/२०१४, दि.१४/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस विविध मान्यवरांनी वेगवेगळ्या कामकाजास्तव वेगवेगळ्या दिनांकास भेट दिली होती. यामध्ये केंद्र व राज्य शासनाकडील निवडणूक अधिकारी, आय.सी.एल.ई. आय साऊथ आशियाकडील कमिटी, आय.टी.आय, मोरवाडी मधील प्रशिक्षणार्थीकरीता आयोजित करीयर डे चे कार्यक्रमासाठी कंपनीचे प्रतिनिधी , यशदामार्फत आलेले अधिकारी, दहा कलमी स्पर्धेकरीता नियुक्त समिती

सदस्य तसेच मा. अध्यक्ष, चौथा वित्त आयोग महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य यांचा समावेश आहे. या मान्यवरांकरीता चहापान, नाष्टा, भोजन व्यवस्था करण्यात आली होती. याकामी र.रु.३७,३०६/- इतका खर्च झालेला आहे. याखेरीज पोलीस खात्याकडील भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शांतता कमिटीची दि. १३/६/२०१४ रोजी आयेजित करण्यात आलेल्या बैठकीकरीता अंकुशराव लांडगे नाट्यगृह , भोसरी उपलब्ध करुन देण्यात आले होते. यासाठी र.रु ६,३३०/- इतका खर्च आलेला आहे. अशाप्रकारे दोन्ही बाबींकरीता झालेला एकत्रित र.रु. ४३,६३६/- (अक्षरी र.रु. त्रेचाळीस हजार सहाशे छत्तीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०२ विषय क्रमांक – ५३

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भः- मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/१/कावि/८०४/२०१४, दि.१०/०७/२०१४

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असणा-या माध्यमिक विद्यालय काळभोरनगर व माध्यमिक विद्यालय श्रमिकनगर निगडी येथे क्र. माध्य/शि/१/कावि/१४४२/२०१३ दि.१६/०९/२०१३ अन्वये विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारणेचे दृष्टीने हस्ताक्षर प्रकल्प सुरू करणेबाबत मान्यता दणेत आली आहे.तसेच माध्यमिक विद्यालय काळभोरनगर व श्रमिकनगर यांनी श्रीम.किरण संजीव वत्स व शैला संजय पाचपुते यांनी दिनांक ८/७/२०१३ ते ५/०९/२०१३ या कालावधीत इ. ८ वी ते इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनपर वर्ग घेतले बाबत कळविले असून त्यांचे सदर कालावधीतील मानधन अदा करणेबाबत शिफारस केलेने या दोन्ही मार्गदर्शकांना उपरोक्त नमूद कालावधीतील मानधन श्रीम.शैला संजय पाचपुते यांना र.रू १९,३२०/- व श्रीम.किरण संजीव वत्स यांना र.रू १५,८४०/- इतके मानधन अदा करणेत आले आहे. तरी सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०३ विषय क्रमांक – ५४

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - स्थापत्य

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/६३८/२०१४, दि.१६/०७/२०१४

विषय - औंध रावेत रस्त्यावर थेरगांव डांगे चौक उड्डाणपुला खालील रस्त्यामधील मिडीअन काढून रस्ता दुरूस्ती करणे.

विषय क्रमांक ५४ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७४०४ विषय क्रमांक – ५५

दिनांक – २४/०७/२०१४ विभाग - नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. नावियो/१/कावि/५२६/१४ दि.२१/०७/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील विविध योजनांचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील अर्ज मागविणेत येणार आहेत. सदर विविध योजनांचे अर्ज तपासणी/छाननीचे कामकाज व लाभार्थींची पात्र/अपात्र यादी तयार करण्याचे कामकाज समुह संघटकांमार्फत केले जाते. तसेच केंद्रशासन पुरस्कृत NULM या नवीन योजनेची वस्ती पातळीवर प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी समुह संघटकांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तरी विभागाकडील विविध योजनांची कामे समुह संघटकांविना अडून राहू नयेत, सर्व कामे सुरळीतपणे पुर्ण होणेसाठी, समुह संघटकांची सध्याची मुदत (दि.२२/०७/२०१४) रोजी संपलेनंतर पुढे सहा महिने कालावधीसाठी अथवा नवीन नेमणूक होईपर्यंत, (जो कमी असेल त्या कालावधीसाठी) सध्या विभागात कार्यरत असलेल्या ८ समुह संघटकांना मुदतवाढ देण्यास व त्याकामी दरमहा प्रति समुह संघटक मानधन र.रु.७५१७/- व वाहन भत्ता र.रु.५००/- या दराने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०५ विषय क्रमांक – ५६

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्रमांक २/१/२०१२-१३ व २/२/२०१२-१३ मधील मोशी कचरा डेपो व स.नं.१३१ कचरा डेपो येथे वृक्षारोपण व त्याची दोन वर्ष देखभाल पाण्यासह करणेकामी मे.प्रियांका इन्टरप्रायजेस यांना सोपवणेत आले होते. सदर कामाची मुदत संपलेली असलेने पुढील सहा महीने कालावधीसाठी देखभाल व पाणी व्यवस्था, निविदा नोटीस क्रमांक २/१/२०१२-१३ व २/२/२०१२-१३ चे दराने मे.प्रियांका इन्टरप्रायजेस यांना मुदतवाढ देणे व त्याकामी येणारे खर्चास मोशी कचरा डेपोसाठी अंदाजे ६,००,०००/- रुपये आणि स.नं.१३१ कचरा डेपोसाठी ३,००,०००/- रुपये खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०६ विषय क्रमांक – ५७

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.७२२१ दिनांक ८/७/२०१४ मधील पान क्र. “७०१” हा मजकूर वगळण्यात यावा व त्याऐवजी “७३०” हा मजकूर समाविष्ट करण्यात यावा. तसेच अ.क्र. “२२” हा मजकूर वगळण्यात यावा व त्याऐवजी “७८” हा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०७ विषय क्रमांक – ५८

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भः- मा.प्रसाद शेट्टी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

सालाबादप्रमाणे यंदाही दिनांक ०१/०८/२०१४ रोजी पिं.चिं.मनपातर्फे चोंधे लॉन्स पिंपळे निलख व श्री. मोरया गोसावी मंदीराजवळ, ज्येष्ठ नागरीक संघ, विरंगुळा केंद्र मासुळकर कॉलनी येथे नागपंचमी साजरी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०८ विषय क्रमांक – ५९

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

प्रस्तावात नमुद प्रमाणे मनपा अंदाजपत्रकात वाढ घट करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

(वाढ/घट र.रु.४०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०९ विषय क्रमांक – ६०

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (ब क्षेत्रीय स्थापत्य) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे तरतुदी वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१० विषय क्रमांक – ६१

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

इ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,२०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४११ विषय क्रमांक – ६२

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संत ज्ञानेश्वर उद्यान, सेक्टर नं.२८, प्राधिकरण, निगडी, पुणे – ४४ या उद्यानात सिमेंट पाईपच्या आधारे तयार केलेला सभा मंडप (शेड) आहे. सदर मंडपातील काही भाग भारतीय भुतपुर्व सैनिक संघास पुणे जिल्हा निवृत्त ज्येष्ठ माजी सैनिक कार्यालय/ विरंगुळा केंद्राकरीता विना मोबदला वापरण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१२ विषय क्रमांक – ६३

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

भोसरी मधील आरक्षण क्रमांक ४१४ येथे उद्यान विकसीत करणे या कामामध्ये अंतर्गत विकासाचे कामात वाढ झालेने सदर कामाचे सुधारित खर्च र.रु८५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंच्याऐंशी लाख फक्त) इतका होणार असलेने सदर कामाचे सुधारित खर्चास (वाढीव खर्च र.रु.३९,००,०००/- अक्षरी र.रु. एकोणचाळीस लाख फक्त) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१३ विषय क्रमांक – ६४

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

महापालिकेत नित्य येणारे अभ्यागत, प्रमुख पाहुणे, मान्यवर व सन्माननीय यांना व मान्यवर यांना आषाढी वारी पालखी सोहळ्यांतील दिंडीक-यांना देण्यात आलेले संत ज्ञानेश्वर महाराज व त्यांचे बंधू भगिनी आणि संत नामदेव यांच्या भेटीवर आधारित समूहशिल्प भेट देण्यात यावेत. याकरिता एकूण १५० शिल्प तयार करुन घेण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार सदरहू १५० शिल्प थेट पद्धतीने तयार करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१४ विषय क्रमांक – ६५

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर,मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G-4B/६/२०११-१२ मधील अ.क्र.५९ अन्वये, चिंचवड SKF ते प्रेक्षागृहापर्यंतच्या नाल्याची सुधारणाची कामे करणे व स्थापत्यविषयक अनुषंगिक कामे करणेकामी मे.पांडुरंग कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.८४,०२,७८०/- र.रु.चौ-याऐंशी लाख दोन हजार सातशे ऐंशी) पेक्षा २२.२२% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६८,६२,४६६/- (निविदा रक्कम - निविदा

दर + ५% मिळुन) पर्यंत काम करुन घेण्यात आले आहे. परंतु मा.स्थायी समिती ठराव क्र. १५६६३ दि.०८/११/२०११ अन्वये सदर कामास ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६५,३५,६८२/- अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. तरी वरील निविदा मंजुर दराने र.रु.६८,६२,४६६/- च्या मान्यतेकामी व सदरच्या कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ-घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१५ विषय क्रमांक – ६६

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भः- मा.आशा शेंडगे, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

मनपाचे कासारवाडी येथील सितांगण उद्यान देखभाल व संरक्षणाचे कामकाज निविदा न मागविता थेट पद्धतीने निविदा नो. क्र.११, २०१२-१३ (बाब क्र.१२) चे निविदा दरानुसार र.रु.३.४२ प्रति चौ.मी. प्रति महा. दराने व यासह एक सुरक्षा रक्षकाचे खर्चासह मे.श्री. व्यंकटेश्वरा बेरोजगार सेवाभावी संस्था यांना ०१ वर्षे कालावधीसाठी देणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१६ विषय क्रमांक – ६७

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुदी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१७ विषय क्रमांक – ६८

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि. १ मे २०१४ पासून राबविण्यात आली आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने वाय.सी.एम. रुग्णालायातील योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडून दि. १ मे २०१४ पासून कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास मान्यता देण्यात यावी व पुढील काळात केसपेपर शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांत व दवाखान्यांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील दि. १ मे २०१४ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमधील पात्र लाभार्थ्यांकडून केसपेपरकरीता कोणतेही शुल्क आकारले नसलेने त्यास व पुढील काळात महानगरपालिकेच्या अन्य सर्व रुग्णालये व दवाखान्यांमध्ये दाखल होणा-या पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी शिधापत्रिकाधारक नागरीकांसाठी केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारणेत येऊ नये यास

मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१८ विषय क्रमांक – ६९

दिनांक – २४/०७/२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भः- मा.शांताराम भालेकर, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालय कामाचे तरतूद वर्गीकरण प्रस्तावात नमूदप्रमाणे करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१९ विषय क्रमांक – ७०

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविली जाते या योजने अंतर्गत कल्याणकारी घटक योजना क्र. ७ मागासवर्गीय युवकांना विविध प्रशिक्षण देणे ही योजना आहे. शहर सुधारणा समिती सभा क्र. ५५ दि. २२/०१/२०१४ च्या ठरावानुसार वरील योजनेत धोरणात्मक बदल करण्यात आलेला आहे. त्या नुसार सदरचे प्रशिक्षण शासनाकडील मान्यता प्राप्त प्रपत्र अ नुसार अर्हताधारक V.T.P. संस्थेमार्फत शासनमान्य अभ्यासक्रमांचे शासनमान्य दराने प्रशिक्षण देणे या प्रमाने पुर्वीच्या योजनेत सुधारणा करण्यात आली आहे. तसेच दिनांक २०/०२/२०२४ या दिवशी सर्वसाधारण सभेमध्ये वरील विषयाला मान्यता देऊन चारचाकी वाहन प्रशिक्षण ही देण्यात यावे या उपसूचनेसह घटक योजना क्र. ७ ला मान्यता देण्यात आली आहे.

मोरया सामाजीक प्रतिष्ठान ही संस्था V.T.P. बाबतच्या अटी, शर्ती क्र. १ते ४ या मध्ये बसत असून या संस्थेने आतापर्यंत अनेक योजनेत प्रशिक्षणांचे कामकाज केले आहे. त्यापैकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत BPL विदयार्थ्यांना प्रशिक्षण देणे, समाजकल्याण विभागा अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम चालविले आहेत. महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत व्यावसायीक प्रशिक्षण कार्यक्रम देणे, जिल्हा अधिकारी कार्यालय अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत प्रशिक्षण योजना, MES योजना, वरील योजनेत मोरया सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेनी अत्यंत यशस्वीरीत्या कामकाज केले असून प्रशिक्षणार्थीना शासनांचे प्रमाणपत्र मिळवून दिले आहेत. संस्थेनी अनेक प्रशिक्षणार्थीना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिला आहे.

अदयाप मागासवर्गीय कल्याणकारी योजना घटक क्र.७ अंतर्गत, एकही प्रशिक्षण वर्ग न झाल्याने त्याचा निधी न वापरला गेल्यामुळे मागासवर्गीय विदयार्थी त्या पासून वंचित राहीले गेले आहेत. येणारी विधानसभा निवडणूकीची आचारसंहीता सुरु होण्यापुर्वी मागासवर्गीय कल्याणकारी योजना क्र. ७ सुरु होणे गरजेचे आहे.

तरी वरील संस्थेचा कामाचा अनुभव लक्षात घेऊन या संस्थेस प्रशिक्षणाचे काम देऊन येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२० विषय क्रमांक – ७१

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

महीला व बाल कल्याण योजनेअंतर्गत दिड वर्ष पुणे झालेल्या बचतगटांना अनुदान देणे ही योजना कार्यान्वित आहे. या योजने अंतर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी जाहीर प्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता एकूण ११०१ अर्ज प्राप्त झाले या अर्जाची छाननी केली असता २३० इतके अर्ज पात्र ठरले व ८७१ इतके अर्ज अपात्र ठरले आहेत. योजनेच्या नियमाप्रमाणे पात्र बचतगटांना प्रत्येकी र.रु. २०,०००/- इतके अनुदान देय आहे. तरी एकूण पात्र ठरलेल्या २३० बचतगटांना प्रत्येकी र.रु. २०,०००/- याप्रमाणे एकूण र.रु. ४६,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्ततेअभावी अपात्र ठरले आहेत अशा बचतगटांची पुर्तता करुन घेऊन त्यांना सुध्दा अनुदानाचा लाभ देणे आवश्यक आहे.

तरी पात्र ठरलेल्या २३० बचतगटांना प्रत्येकी र.रु. २०,०००/- याप्रमाणे एकूण र.रु. ४६,००,०००/- इतक्या खर्चास तसेच जे अपात्र अर्ज कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर पात्र ठरतील त्यांना सुध्दा प्रत्येकी र.रु. २०,०००/- याप्रमाणे अनुदानाकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२१ विषय क्रमांक – ७२

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ :- मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१.०० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२२ विषय क्रमांक – ७३

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक– मा.रमा ओव्हाळ

संदर्भ :- मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

स्थापत्य क क्षेत्रिय कार्यालयकडील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वाढ/घट करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४,२५०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२३ विषय क्रमांक – ७४

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ :- मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

फ क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१४-१५ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ६.०० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२४ विषय क्रमांक – ७५

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक– मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या सोयीसाई यापुर्वी अ/ब/क/ड असे चार प्रभाग कार्यालयामार्फत नागरीकांना सुविधा पुरविणेचे कामकाज करीत होते. तथापी त्यामध्ये अधिक सुलभता येण्यासाठी दिनांक २६/०१/२०१४ पासून नविन इ व फ असे दोन नविन क्षेत्रिय कार्यालय सुरु करणेत आलेले आहे. इ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ६,७,२९,३०,३१,३२,३३,३४,३५ व ३६ या दहा प्रभागांचा अंतर्भाव करणेत आलेला आहे.

इ क्षेत्रिय कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात सदयस्थितीत काम करणारे श्री.मिलींद छबुराव जवळकर, सदगुरु कृपा बिल्डींग कासारवाडी पुणे ३४ यांची लिपीक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नेमणूक करण्यास व मनपा नियमानुसार किमान वेतन दराने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२५ विषय क्रमांक – ७६

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक– मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ६.०० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२६ विषय क्रमांक – ७७

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक– मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

कै.अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन व्यायामशाळा व कै.मधुकर पवळे व्यायाम शाळा, निगडी गावठान प्रभाग क्र. १३ द.म. र.रु. २०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार अकरा महिने कालावधीकरीता हनुमान स्पोर्टस ॲकेडेमी, हनुमान हेल्थ क्लब मोरे वस्ती साईमंदिरामागे गाव मौजे चिखली पुणे-१४ या संस्थेस चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२७ विषय क्रमांक – ७८

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक– मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१९,७५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२८ विषय क्रमांक – ७९

दिनांक – २४.०७.२०१४ विभाग - जलनि:सारण

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.shi/२०६/२०१४ दि.२१/७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून —

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत च-होली मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.७ मध्ये च-होली गावठाण परिसर, माळीपेठा, ताजणेमळा, दाभाडेवस्ती, काळजेवस्ती, बुर्डेवस्ती इ.भागात जलनि:सारण नलिका टाकण्याचे काम चालू आहे. सदर कामांतर्गत वडमुखवाडी व ताजणेमळा येथील नाल्यामध्ये जलनि:सारण नलिका टाकण्याचे काम चालू आहे. सदर काम नाल्यामधून करीत असताना पेट्रोल लाईन क्रॉसिंग करणे अत्यावश्यक आहे. सदरचे काम केल्यामुळे साईनगरी, लक्ष्मीनारायण नगर व ताजणेमळा या रहिवाशी भागातील सार्वजनिक आरोग्याचा सांडपाण्याचा प्रश्न सुटण्यास, इंद्रायणीनदीचे होणारे प्रदुषण रोखण्यास व पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे. व सदरचे मैला पाणी च-होली येथील मलशुध्दीकरण केंद्रांतर्गत येणार आहे. सदर पेट्रोल लाईनचे क्रॉसिंग करणेकामी हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. मुंबई पुणे पाईपलाईन (HPCL) लोणीकाळभोर यांचेकडे या विभागामार्फत पत्र व्यवहार करणेत आले आहे. व त्यांचे मागणीप्रमाणे नकाशे सादर करणेत आले आहेत. तसेच हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन यांचे अधिका-यांसमवेत समक्ष जागेची पाहणी करणेत आलेली आहे. सदर पेट्रोल लाईन क्रॉसिंग करणेकामी मे.एच.पी.सी.एल. यांनी क्रॉसिंग चार्जेस भरणेबाबत दि.३०/०६/२०१४ रोजीचे पत्राद्वारे कळविले आहे. या कामासाठी सुमारे ४ दिवस अपेक्षित आहेत व त्यांचे मागणीपत्रानुसार चार दिवसांसाठी र.रु.१८,०००/- प्रतिदिन या प्रमाणे ( ४ x १८००० = ७२,०००/-) र.रु.७२,०००/- भरणे आवश्यक आहे. तरी सदरची रक्कम रुपये ७२,०००/- मे.हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेचा तसेच च-होली मैलाशुध्दीकरण केंद्राअंतर्गत प्रभाग क्र.७ मध्ये च-होली गावठाण परिसर, माळीपेठा, ताजणेमळा, दाभाडेवस्ती, काळजेवस्ती, बुर्डेवस्ती इत्यादी भागात जलनि:सारण नलिका टाकणे या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे तळवडे चिखली येथील प्रभाग क्र. १,३,५ परिसरात देखील जलनि:सारण नलिका टाकण्याची कामे सुरु आहेत सदर भागातून देखील जलनि:सारण नलिका टाकताना हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.कंपनीचे पेट्रोल लाईन क्रॉसिंग करावी लागणार आहे. सदर क्रॉसिंग करताना हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. कंपनीस कामाच्या स्वरुपानुसार रक्कम अदा करावी लागणार आहे तरी त्या त्या ठिकाणी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. कंपनीने मागणी केल्यानुसारची रक्कम त्या त्या कामासाठीचे उपलब्ध तरतूदीमधुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४२९ विषय क्रमांक – ८०

दिनांक – २४.०७.२०१४ विभाग - जलनि:सारण

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.जनि/कावि/१०/३१७/२०१४ दि.१४/७/२०१४

पिंपरी-चिंचवड मनपा व पुणे मनपा यांचे सांडपाण्यामुळे मुळा-मुठा व भिमा नदीचे पाणी दुषित झाल्यामुळे बाधित गावांमध्ये आर.ओ.यंत्रणा बसविणेबाबत मा.विधानसभा अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दि.९/७/२०१३ रोजी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत त्यांनी बाधित गावांसाठी आर.ओ. यंत्रणा

बसविणेकरिता येणारा खर्च एकूण र.रू.१०.१३ कोटी दोन्ही महानगरपालिकेने समसमान सोसावा असे सुचित केले. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एकूण रक्कमेच्या ५०%रक्कम म्हणजेच र.रू. ५.०६५ कोटी पुणे जिल्हा परिषद यांना दि.३१/७/२०१३ चे धनादेशान्वये अदा करणेत आली आहे. त्यानंतर उपरोक्त विषयाबाबत दि.४/९/२०१३ रोजी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली व संबधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वरील दिलेल्या रक्कमेमध्ये फक्त ८२ गावासाठी आर.ओ. यंत्रणा बसविणे शक्य होत आहे. त्या व्यतिरिक्त जादा ३४ गावामध्ये आर.ओ. यंत्रणा बसविणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. या गावांकरिता एकूण रक्कम रू.३.७७ कोटी इतक्या अधिक निधाची आवश्यकता असल्याने दोन्ही महानगरपालिकेने सदरचा निधी समप्रमाणात पुणे जिल्हा परिषदेकडे वर्ग करणेबाबत ठरले आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम रू.१८८.५० लक्ष पुणे जिल्हा परिषदकडे वर्ग करणेबाबत विभागीय आयुक्त यांनी दि.३०/१०/२०१३ चे पत्रान्वये कळविले आहे. तदनुषंगाने सदरचा निधी पुणे जिल्हा परिषद यांना अदा करणेच्या प्रस्तावास मा.महापालिका सभेने ठराव क्र.५२५, दि.५/७/२०१४ अन्वये मान्यता दिली आहे. सदर बाबीकरीता सन.२०१४-१५ चे अंदाजपत्रकात तरतूद नाही. तथापि भुयारी गटर योजना अंदाजपत्रक पान क्र.७८५, अनु.क्र.२ नुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ या शासन संस्थाना भूमिगत मलवाहिनी टाकण्याचे परवानगी कामी रक्कम अदा करणे ह्या उपलेखाशिर्षाखाली उपरोक्त रक्कम अदा करावी लागणार असल्याने त्याप्रमाणे रक्कम अदा करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे तरतूद वर्ग करणेचा प्रस्ताव आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक सन २०१४-१५ पृष्ठ क्र./अनु.क्र. | उपलब्ध तरतूद र.रू. लक्ष | लागणारी तरतूद र.रू.लक्ष | वाढ र.रू. लक्ष | घट र.रू. लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भु.ग.यो. (ब प्रभाग) | ७८८/३३ | १०० | ११.५० | ०.०० | ८८.५० |
| २ | भु.ग.यो. (ई प्रभाग) | ८००/१२ | ४०० | ३०० | ०.०० | १०० |
| ३ | भु.ग.यो. (ब प्रभाग) | ७८५/२ | १० | १९८.५० | १८८.५० | ०.०० |
| | | **एकूण रक्कम रू.** | **५१० लक्ष** | **५१० लक्ष** | **१८८.५० लक्ष** | **१८८.५० लक्ष** |

वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरण करून पुणे जिल्हा परिषदेस र.रू.१८८.५० लक्ष अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४३० विषय क्रमांक – ८१

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु. ७३.९० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४३१ विषय क्रमांक – ८२

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ :- मा.आशा शेंडगे, मा.सुनिता वाघेरे, मा.संगिता भोंडवे, मा.सुनिता गवळी, मा.माया बारणे यांचा प्रस्ताव-

सन २०१३-२०१४ आर्थिक वर्षापर्यंत ज्या महिलांनी प्रशिक्षण घेतले (शिवणकाम प्रशिक्षण) आहे अशा सर्व महीला अर्जदारांना उत्पन्नाची अट न ठेवता टप्याटप्याने शिवण यंत्राचे वाटप करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४३२ विषय क्रमांक – ८३

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ : - मा.शांताराम भालेकर व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ७३३५ दिनांक १५/७/२०१४ मधील " किमान रक्कम " हा मजकुर वगळण्यात यावा व त्या ऐवजी " कमाल रक्कम (सेवा शुल्कासहीत) " हा मजकुर समाविष्ट करण्यात यावा व " ठोस कारवाइ " या मजकुरानंतर " (मनपा हद्दीत व्यवसाय बंदी तसेच गणेश चतुर्थीच्या दिवशी दिनांक २९/०८/२०१४ ला अतीक्रमण पथकाची देखरेख) " हा मजकूर समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४३३ विषय क्रमांक – ८४

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक– मा.सदगुरु कदम

संदर्भ :- मा.विनय गायकवाड व मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती ठराव क्र.७३२६, दि.१५/०७/२०१४ अन्वयेचा ठराव रद्द करणेस व सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात स्थापत्य विभागाअंतर्गत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२४०००००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४३४ विषय क्रमांक – ८५

दिनांक – २४.०७.२०१४

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ :- मा.सदगुरु कदम व मा.प्रसाद शेट्टी यांचा प्रस्ताव-

मा.स्थायी समिती अध्यक्ष यांच्या वापरात असलेले वाहन जुने झाले असलेने वारंवार बंद पडत असलेने कार्यालयीन कामास अडचण येत आहे. सबब त्यांच्या वापराकरीता स्कॉरपिओ हे वाहन सर्व

सुविधांसह वाहन उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून निविदा न मागविता करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/६१९/२०१४
दिनांक - २४/०७/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

E:\e drive\Nagersachiv1\Standing 12-17\Proceeding124.doc